यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra
Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : www.ycmou.ac.in  https://ycmou.digitaluniversity.ac
ई–मेल E-mail : registrar@ycmou.digitaluniversity.ac  दूरध्वनी Telephone : (0253) 2230229

कुलसचिव कार्यालय / Registrar Office

प्रति,  जा.क्र. : यचममुवि/कुका-48/2023/160
सर्व विभागीय संचालक/व. शैक्षणिक सल्लागार
य.च.म.मुक्त विद्यापीठाचे सर्व विभागीय केंद्र  दिनांक : 24/07/2023

**विषय : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 – "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह" साजरा करणेबाबत...**

**संदर्भ : (1) मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. युएनआय/(136/22)विशि-1/भाग-2/8056 दि. 13 जुलै, 2023 चे पत्र**
**(2) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांचे दि. 20 जुलै, 2023 चे पत्र**
**(3) संचालक, अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र यांचे दि. 18 जुलै, 23 चे पत्र**
**(4) विद्यापीठाचे दिनांक 24 जुलै, 2023 चे परिपत्रक**

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. (1) अन्वये महाराष्ट्र शासनाने दिनांक 24 ते 29 जुलै, 2023 या कालावधीत **"राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह"** म्हणून साजरा करण्याचे योजिले असल्याचे कळविले आहे. त्यानुसार संचालक, अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र यांचे संदर्भिय पत्र क्र. (3) नुसार आपापल्या विभागात विषयांकित बाबतीत कार्यवाही करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. तसेच संदर्भ क्र. (4) येथील परिपत्रकान्वये विद्यापीठ मुख्यालयात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत.

मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार आपणास पुन्हा एकदा कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भाप्रमाणे आपल्या विभागीय केंद्रात कार्यक्रमांचे आयोजन करून 24 ते 29 जुलै, 2023 या कालावधीत **"राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह"** साजरा करण्यात यावा. यासाठी आपल्या अधिनस्त अभ्यासकेंद्रांना आवश्यक सूचना देऊन समंत्रक, केंद्र प्रमुख, संयोजक, सहायक, विद्यार्थ्यांना सहभाग नोंदविणेबाबत कळविण्यात यावे. यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1) संदर्भ क्र. (2) नुसार Inspiring Competetions, NEP Exhibition, Media Engagement, Social Media Campaign, Panel Discussions and Webinars, Stakeholder Consultations व Community Outreach Programs इ. संबंधित कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

2) आपण आयोजित करीत असलेल्या कार्यक्रमांना रोजच्या रोज प्रसिद्धी देण्यात यावी.

3) संदर्भ क्र. (4) नुसार विद्यापीठ मुख्यालयात आयोजित करण्यात येत असलेले कार्यक्रम विद्यापीठाच्या ycmou.ac.in या संकेतस्थळावर होम पेज / You Tube वर थेट प्रक्षेपण उपलब्ध

करून देण्यात येणार आहे. या कार्यक्रमांना विद्यार्थी, समंत्रक, केंद्र प्रमुख, संयोजक, सहायक यांचा जास्तीत जास्त सहभाग नोंदविला जाईल याबाबत कार्यवाही करावी.

4) उपरोक्त प्रमाणे होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये सहभाग घेणाऱ्या संबंधितांची नोंद घेऊन रोजच्या रोज अहवाल सादर करावा.

याबाबतीत सर्व सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येऊन याबाबत वेळोवेळी अध्यक्ष / सचिव, NEP Cell व संचालक, अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे व कार्यवाहीचा अहवाल छायाचित्रांसह दररोज न चुकता nep2020week@ycmou.ac.in या ईमेल सादर करण्यात यावा.

तदनंतर सप्ताह संपल्यानंतर एकत्रित अहवाल कुलसचिव कार्यालयास सादर करावा म्हणजे शासनाच्या संदर्भ क्र. (1) च्या अनुषंगाने शासनास त्वरित अहवाल सादर करता येईल.

आपला,

(भटूप्रसाद पाटील)
कुलसचिव (प्र.)

प्रत :

1) मा. अध्यक्ष / सचिव, NEP Cell

2) संचालक, अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र/नियोजन अधिकारी

3) प्रमुख, दृकश्राव्य निर्मिती केंद्र : उपरोक्त प्रमाणे ycmou.ac.in या संकेतस्थळ / You Tube वर ऑनलाईन कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

4) संचालक, विद्यार्थी सेवा विभाग : मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार दिनांक 25 जुलै, 2023 रोजी सकाळी 11.00 वा. सर्व विभागीय संचालक/व. शैक्षणिक सल्लागार यांची बैठक घेऊन उपरोक्त प्रमाणे कार्यवाही होईल यासाठी आवश्यक सूचना द्याव्यात.

5) जनसंपर्क अधिकारी : NEP Cell, संचालक, विद्यार्थी सेवा विभाग, सर्व विभागीय संचालक / व. शैक्षणिक सल्लागार यांचे दररोज संपर्क साधावा तसेच nep2020week@ycmou.ac.in या ईमेलवर प्राप्त झालेल्या अहवाल व छायाचित्रांच्या अनुषंगाने वर्तमानपत्रात प्रसिद्धीची कार्यवाही करावी.